महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६७ वा | दिनांक : ०६/१२/२०२४ | वार : शुक्रवार

# देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर १३ दिवसांनी आज महाराष्ट्राला नवे सरकार मिळाले. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आयोजित एका शानदार समारंभात महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून पद व गोपनीयतेची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. फडणवीस आता महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झालेत.

देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. शपथ घेण्यापूर्वी त्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव घेतले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शहा यांचे आभारही मानले.

एकनाथ शिंदे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. ते सहाव्यांदा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झालेत.

या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व देशभरातील गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

दरम्यान, २८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागला. त्यात महायुती म्हणजेच भाजप - शिवसेना शिंदे - राष्ट्रवादी पवार यांना २३० जागांचे प्रचंड बहुमत मिळाले होते.

## नवे सरकार धोरणात्मक निर्णय घेणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** महाराष्ट्रातील निवडणूक निकालानंतर १३ दिवसांनी नवीन सरकार लाभले. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली असून ते राज्याचे २१ मुख्यमंत्री झाले आहेत. त्याचवेळी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार सहाव्यांदा उपमुख्यमंत्री झाले आहेत. त्यांच्याशिवाय शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. फडणवीस यांच्यानंतर मुख्यमंत्रीपदावरून उपमुख्यमंत्री होणारे शिंदे हे दुसरे नेते आहेत.

शपथविधीनंतर महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाची पहिली बैठक पार पडली.

या बैठकीनंतर मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याचा कारभार योग्य प्रकारे चालला आहे की नाही, हे सांगण्याचे काम पत्रकार करतात. तसेच ज्या गोष्टी जनतेपर्यंत पोहोचवायच्या असतात त्या तुम्ही पोहोचवतात. गेली अडीच वर्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही सरकार चालवले.

महाराष्ट्र आता थांबणार नाही, गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्राने विकासाची गती घेतली आहे आणि त्या गतीनेच महाराष्ट्र पुढे जाईल. सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र अग्रणी राहील असा मी विश्वास व्यक्त करत आहे. रोल जरी आता बदलले असले तरी समन्वय तोच राहणार आहे. आता आमची पहिली मंत्रिमंडळ बैठक झाली, तेव्हा आम्ही आमच्या अधिकाऱ्यांना सांगितले की आता टेस्ट मॅच आहे त्यामुळे योग्य निर्णय घेत राज्याला पुढे न्यायचे आहेत. नदी जोड प्रकल्प असेल किंवा सौर ऊर्जेचे प्रकल्प असतील किंवा सामाजिक क्षेत्रातले लाडकी बहीण सारखे प्रकल्प असतील हे निर्णय पुढे सुरूच ठेवायचे आहेत. आमचा प्रयत्न हा असणार आहे की आमच्या वचननाम्यात जी काही वचन आम्ही दिली आहेत ते सर्व आम्ही पूर्ण करणार.

# अजितदादा पुन्हा शरद पवारांचा पक्ष फोडणार?



**मुंबई :** महाराष्ट्रातील महायुती सरकारचा शपथविधी सोहळा अवघ्या काही तासांवर आला आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. पण तत्पूर्वी, ते पुन्हा एकदा आपले चुलते शरद पवारांचा पक्ष फोडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी त्यांनी पक्षाच्या एका महिला नेत्यावर सोपवल्याची माहिती आहे.

विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागा जिंकल्या. तर शरद पवारांच्या पक्षाला अवघ्या १० जागांवर समाधान मानावे लागले. त्यानंतर आता अजित पवारांनी शरद पवारांच्या गोटातील आणखी काही आमदार व खासदारांना आपल्या पारड्यात ओढण्यासाठी प्रयत्न सुरू केलेत. यासाठी त्यांनी मोठी रणनीती आखली आहे.

NBT च्या वृत्तानुसार, अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांचे नेते फोडण्याची जबाबदारी आपल्या पक्षाच्या एका महिला नेत्यावर टाकली आहे. त्यानुसार या महिला नेत्याने आपले फासे टाकण्यास सुरुवातही केली आहे. अजित पवारांच्या दिल्ली दौऱ्याचा संबंधही या प्रकरणाशी जोडला जात आहे. असे झाले तर केंद्रातील एनडीए सरकारला आणखी बळकटी प्राप्त होईल. कारण, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा सध्या केवळ १ खासदार आहे. ते सुनील तटकरे आहेत. याऊलट शरद पवारांकडे ८ खासदार आहेत. यात त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांचाही समावेश आहे.

अजित पवार यांच्या दिल्ली दौऱ्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवारांचे काही खासदार अजित पवार गटात जाण्याची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे अजित पवार सहाव्यांदा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत असताना ही चर्चा सुरु झाली आहे. अजित पवारांच्या खासदारांची संख्या वाढल्यानंतर केंद्रात प्रफुल्ल पटेल यांना कॅबिनेट मंत्री केले जाईल अशीही चर्चा आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे शरद पवार गटाचे भिवंडीचे खासदार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे यांनी सोमवारीच भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर जाऊन भेट घेतली होती. म्हात्रे यांनी आपण आपल्या खासगी कारणांसाठी फडणवीसांची भेट घेतल्याचे स्पष्ट केले होते. पण या भेटीमागे अनेक कारणे दडल्याचा दावा केला जात आहे.

# राज्याच्या माथी गुजरातधार्जिणे सरकार बसले : नाना पटोले



**मुंबई :** निवडणूक आयोगाच्या मदतीने मतमोजणीत घोटाळे करुन महाराष्ट्रात जनतेच्या मतांची चोरी करणारे सरकार राज्यात स्थापन झाले आहे. चोरीचे बहुमत असतानाही नव्या सरकारची स्थापनाच वादाने झाली असून या तीन पक्षातील अंतर्गत वादामुळे महाराष्ट्राची प्रतिमा देशात मलीन झाली आहे. महाराष्ट्राच्या माथी पुन्हा गुजरातधार्जिणे सरकार बसले असले तरी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला धक्का लावू नये, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

नव्या सरकारच्या स्थापनेसंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महायुतीकडे बहुमत असतानाही सरकार स्थापन्यासाठी कसरत करावी लागली. एकनाथ शिंदे व अजित पवार यांना या सरकारमध्ये फारसे महत्व दिले जाईल असे वाटत नसल्याचे पटोले म्हणाले. दिल्लीत वाऱ्या करुन मंत्रीपदांची भीक मागण्याची वेळ या दोघांवर आली. मोदी शाह यांच्या मेहरबानीवर शिंदे, अजित पवार सरकारमध्ये असतील. एकनाथ शिंदे यांची तर भाजपला आता काहीच गरज नाही त्यामुळे बहुमत मिळाल्यापासूनच शिंदे व अजित पवारांना भाजप व मोदी शाह यांनी जागा दाखवून दिली, अशी टीका त्यांनी केली. भाजपने पुन्हा एकदा दोन प्रादेशिक पक्षांना संपवल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला.

भाजपचे सरकार स्थापन झाले असून निवडणूक त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करावी लागतील. शेतकरी कर्जमाफी, कृषी पंपाची विज बिल माफ, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये, २.५ रिक्त सरकारी पदांची भरती याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी नाना पटोले यांनी केली. काँग्रेस पक्षाची विधानसभेतील संख्या कमी झाली आहे परंतु हिम्मत व ताकद कायम असून जनतेच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असेही नाना पटोले म्हणाले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ डिसेंबर २०२४


# चंपाषष्ठी निमित्त मल्हारपुर (सय्यदपुर) इथे यात्रा



**कन्नड (अरूण थोरात) :** लाडसावंगी येथूनच जवळ असलेले सय्यदपूर (मल्हारपूर) या ठिकाणी भव्य खंडोबा मंदिर असून दरवर्षीप्रमाणे याही वर्ष चंपाषष्ठी निमित्त भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

खंडोबा यात्रा निमित्त श्रीक्षेत्र मल्हारगड सय्यदपुर तालुका जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे पालखी मिरवणूक सकाळी सात वाजता, जागरण गोंधळ सकाळी ११ वाजता, महाप्रसादाचा कार्यक्रम दुपारी एक वाजता संपन्न होईल असे खंडोबा मंदिर विश्वस्त मंडळ यांनी कळविले. अद्भुत विश्व चमत्कारी व नवसाला पावणारा हे खंडोबा मंदिर असून परिसरातील भाविक यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येतात. छत्रपती संभाजी नगर जालना या दोन्ही जिल्ह्यातून व्यापाऱ्यांनी आपले व्यवसायासाठी यात्रेमध्ये आपले दुकान थाटावे व्यापाऱ्यांना लागणारे सहकार्य करण्यात येईल. ही यात्रा तीन दिवस चालणार आहे.

या ठिकाणी टँकरद्वारे पाणी, लाईट व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था व महिलांची सुरक्षा याची खास खबरदारी घेणार आहे. असे संयोजकांनी कळविले आहे.

## शिल्लेगाव पोलिसांकडून विद्यार्थ्यांचा गौरव

**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन येथील श्री स्वामी समर्थ विद्यालयातील विद्यार्थिनी नूतन संजय जगताप हिने नुकत्याच धुळे येथे झालेल्या शालेय क्रीडा कराटे स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावल्याबद्दल तिचा मंगळवारी शिल्लेगाव पोलिस ठाण्याचे पीआय सलीम चाऊस तसेच महिला पोलिस कर्मचारी जकिया शेख व कोमल सोनवणे यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

दरम्यान, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या विभागीय शालेय कराटे स्पर्धेमध्ये गंगापूर तालुक्यातील खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली आहे. यात 14 वर्षे, 17 वर्षे व 19 वर्षे वयोगट व वेगवेगळ्या वजन गटांमध्ये झालेल्या विविध स्पर्धेमध्ये गंगापूरच्या सात खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये आपला प्रवेश निश्चित केला आहे. तसेच आठ खेळाडूंनी अंतिम फेरीपर्यंत मजल मारत द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंचे जिल्हा पोलिस दलाच्या वतीने मंगळवारी शिल्लेगावचे पोलिस निरीक्षक सलीम चाऊस तसेच महिला पोलिस कर्मचारी जकिया शेख, कोमल सोनवणे यांनी शाल, श्रीफळ देऊन विद्यार्थिनींचा गौरव केला.

वाघ याने पटकावला द्वितीय क्रमांक राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रतिनिधित्व करताना नूतन जगताप हिने प्रथम क्रमांक पटकावला व राष्ट्रीय शालेय कराटे स्पर्धा दिल्लीसाठी तिची निवड झाली आहे. तसेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सुमीत वाघ यानेदेखील द्वितीय क्रमांक पटकावला. भक्ती वाघ व अथर्व शिरसाठ याने तृतीय क्रमांक पटकवला.

## मुंबई येथील शपथविधीचा सिल्लोडमध्ये अब्दुल सत्तार यांच्या संपर्क कार्यालया समोर जल्लोष

**सिल्लोड (प्रतिनिधी)** दि. ५, महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईतील आझाद मैदानावर अतिशय भव्यदिव्य स्वरुपात राज्याचा शपथविधीचा कार्यक्रम आज पार पडला. राज्याच्या मुख्यमंत्री पदी देवेंद्र फडणवीस तर उपमुख्यमंत्रीपदी एकनाथराव शिंदे आणि अजित पवार यांनी शपथ घेतली.

हा शपथविधी सोहळा संपन्न होताच सिल्लोड येथे शिवसेना नेते तथा सिल्लोड चे आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. यावेळी तालुका शिवसेनेच्या वतीने मुंबई येथील शपथविधी सोहळ्याचे थेट प्रक्षेपणाची व्यवस्था करण्यात आली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व अजित पवार यांनी शपथ घेताच कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करीत फटाक्याची आतिषबाजी केली. तसेच एकमेकांना पेढा भरून शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा राजश्री निकम, ज्येष्ठ नेते श्रीरंग पाटील साळवे, शिवसेना पदाधिकारी किशोर अग्रवाल, विठ्ठल सपकाळ, महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, सुदर्शन अग्रवाल, सुधाकर पाटील, सुनील दुधे, सत्तार हुसेन, संजय डमाळे, दीपक अग्रवाल, प्रवीण मिरकर, अंकुश पाटील, जितू आरके, मधुकर बेंडाळे, संजय डमाळे,मानसिंग राजपूत, शंकरराव खांडवे, जगन्नाथ कुदळ, शिवा टोम्पे, राजू जमधडे, रवी गायकवाड, राजेश्वर आरके, दत्तू पंडित, सुनील पांडुरंग दुधे, धम्मा दांडगे, संजय शिंदे, दिलीप वाघ, सतीश सिरसाट, फाईम पठाण, बाळू काकडे, महमद फकिरा, गफ्फार शेख, गणेश शेलार, सोहेल मुलताणी, अरुणा महेर, रंजना टोम्पे, ताराबाई डमाळे, अब्दुल बाशीद, शेख इरफान, संजय गोठवाल, तौफिक कादरी ईश्वर कालभीले , रघूलाल झलवार आदी पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.

# कन्नड तालुक्यातील वाङ्मयीन चळवळीचा हा सन्मान आहे : प्राचार्य डॉ. विजय भोसले



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्याला नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक समृद्ध वारसा लाभला असून तिफण च्या माध्यमातून वाङ्मयीन चळवळ अधिक गतिमान झाली आहे. तिफणच्या कविता महोत्सवातून स्थानिक कविंना हक्काचे व्यासपीठ मिळून लिहिण्यासाठी प्रेरणा मिळाली.

त्यामुळे अनेक नवोदित कवी उदयास येऊन सातत्याने लेखन करीत आहे. ही अभिमानास्पद बाब असून कन्नड तालुक्यातील तिफणच्या वाङ्मयीन चळवळीचा हा सन्मान व यश आहे. असे प्रतिपादन येथील शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले.

(ता. ४) कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या पेरणी कवितासंग्रहास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान जाहीर झाल्याबद्दल त्यांचा तिफण त्रैमासिक व मराठी विभागातर्फे प्राचार्य डॉ. भोसले, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी त्यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी बाबुलाल काळे, प्रा. अशोक भोसिकर, प्रा. संतोष देशमुख,लक्ष्मण वाल्डे, श्रीराम दापके यांची उपस्थिती होती. डॉ. प्रतिभा अहिरे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी तर प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. प्रा. संतोष देशमुख यांनी आभार मानले.






शाळा, महाविद्यालय, सामाजिक व राजकीय संघटना, समाजसेवी संस्था आणि इतर समाजोपयोगी कार्यक्रमाचे व्हिडीओ क्लीप किंवा कार्यक्रमांची बातमी तयार करून पाठविल्यास आम्ही आमच्या महाराष्ट्र जनशक्ती न्युज युट्युब चॅनलवर प्रसारित करू. तसेच कार्यक्रमाच्या बातम्या व फोटो आमच्या दैनिक महाराष्ट्र जनशक्ती ऑनलाईन वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करू त्याचबरोबर कविता, कथा, सामाजिक, वैचारिक लेख ही दैनिकात प्रसिद्ध करण्यात येतील. तरी आपण 7588005002 या व्हॉट्सॲप नंबरवर कार्यक्रमाचे व्हिडीओज, बातम्या, कथा, कविता, लेख इ. पाठवावेत. - संपादक - डॉ. हसन इनामदार

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ डिसेंबर २०२४


# आई-वडील हेच आपले खरे दैवत..... डॉ. वसंत हंकारे





केसरजवळगा, ता. उमरगा येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर आयोजित व्याख्यानाप्रसंगी डॉ. वसंत हंकारे बोलताना नागरिक

**मुरुम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** घरातील आईवडिलांना जो सन्मान मिळवून देतो, तोच यशस्वी होतो. आई-वडीलांचे कष्ट आणि त्याग याचा विसर जीवनात पडता कामा नये. आई-वडील एकदा निघून गेले तर जगात कोणीही आपले उरत नाही, जोवर ते आहेत तोपर्यंत त्यांना आनंदी ठेवा. एक समाधानी कुटूंब म्हणून जगायला हवे.

विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या आदर्शावर चालायला हवे. युवक-युवतीनी आपल्या आईवडीलांची मान खाली जाईल, असे काम करू नये, असा मौलिक सल्ला त्यांनी दिला. केसरजवळगा, ता. उमरगा येथील मातोश्री गंगाबाई शिवमुर्ती पाटील यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त डॉ. रोहित पाटील युवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित आई-बाप समजून घेताना या विषयावर डॉ. वसंत हंकारे यांचे व्याख्यान मंगळवारी (ता. ३) रोजी संपन्न झाले. यावेळी डॉ. रोहित पाटील युथ फाउंडेशने केलेल्या कामाचा आढावा सादर करताना डॉ. रोहित पाटील म्हणाले की, आपल्या आईच्या आठवणीने प्रत्येकाच्या काळजाला हात घातला.

जगात सर्व काही मिळू शकते पण आईची माया कधीच मिळणार नाही. आपल्या आईबापांचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आपल्या जीवाचे रान करा, असा संदेश त्यांनी यावेळी दिला. व्याख्याना नंतर मुली आपल्या वडिलांच्या गळ्याला पडून अक्षरशः ओक्साबोक्शी रडत होत्या.

डॉ. रोहित पाटील युवा फाउंडेशने जिल्हा परिषद शाळेस शैक्षणिक, क्रीडा साहित्य, टी. व्ही. संच, वृक्षारोपण, तालुकास्तरीय वकतृत्व स्पर्धा, स्मशानभूमी परिसर स्वच्छता, गावातील गरजू रुग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्यास सहकार्य गुणवंत व कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान, देशभक्तीपर गीत अशा विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. भविष्यात शाळा, आरोग्य व गावाच्या भौतिक सुविधेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचा मानस यावेळी फाउंडेशनकडून बोलून दाखविण्यात आला.

यूथ फाउंडेशनच्या वतीने गावात राबवण्यात येणाऱ्या शैक्षणिक-सामाजिक उपक्रमास सहकार्य म्हणून मयूर राऊत यांनी अकरा हजार, घोडके सूर्यकांत यांनी एकवीस हजार तर कोथळीचे माजी सरपंच आप्पासाहेब पाटील यांनी एकवीस हजार रूपयांचा चेक फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत कलकेरी व शरण कणमुसे यांना सुपूर्द केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रोहित पाटील युथ फाउंडेशनच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन बालाजी भोसले तर आभार युसूफ गवंडी यांनी मानले. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या भव्य प्रागंणावर आयोजित कार्यक्रमात महिला, पुरुष व विद्यार्थ्यांसह मुरूम, आलूर, वरनाळवाडी व आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थी-पालक मोठया संख्येने उपस्थिती होते.

## हेमंत सोरेन मंत्रिमंडळात ५ जुन्याच मंत्र्यांना संधी

**रांची :** हेमंत सोरेन यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सहा दिवसांनी गुरुवारी राजभवनाच्या अशोक उद्यानात ११ मंत्र्यांनी शपथ घेतली. राज्यपाल संतोष गंगवार यांनी त्यांना शपथ दिली. नव्या सरकारमध्ये ५ मंत्र्यांची पुनरावृत्ती झाली आहे. तर JMM आणि काँग्रेसने ५०% मंत्री बदलले आहेत.

विशेष म्हणजे राज्याच्या स्थापनेनंतर प्रथमच फॉरवर्ड कोट्यातून मंत्री करण्यात आलेले नाही. यापूर्वी नेहमीच फॉरवर्ड कोट्यातून एक-दोन मंत्री केले जात होते. गेल्या वेळी गढवामधून निवडणूक जिंकलेले मिथिलेश ठाकूर हे ब्राह्मण चेहरा म्हणून मंत्री झाले. यावेळी त्यांचा निवडणुकीत पराभव झाला आहे. यानंतर इंडिया ब्लॉकने फॉरवर्ड कोटा रद्द केला आहे.

फॉरवर्ड हे भाजपचे पारंपरिक मतदार असल्याचे जाणकारांचे मत आहे. त्यामुळे हेमंत सोरेन सरकारनेही महत्त्व दिले नाही. मात्र, या कोट्यातून मंत्रिपदाच्या शर्यतीत चुन्ना सिंग आणि अनंत देव प्रताप यांची नावे चर्चेत होती.

मंत्रिमंडळात झारखंड मुक्ती मोर्चाचे (जेएमएम) ६, काँग्रेसचे ४ आणि आरजेडीचे एक आमदार मंत्री झाले आहेत. झामुमोचे हफीझुल हसन यांनी उर्दूमध्ये शपथ घेतली. उर्वरित १० मंत्र्यांनी हिंदीतून शपथ घेतली. हेमंत सोरेन यांनी २८ नोव्हेंबर रोजी मोर्हाबादी मैदानावर एकट्याने मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

झामुमोने नव्या मंत्रिमंडळात तीन मंत्र्यांची पुनरावृत्ती केली आहे. चाईबासाचे आमदार दीपक बिरुवा, घाटशिला आमदार रामदास सोरेन आणि मधुपूरचे आमदार हाफिझुल हसन अन्सारी यावेळीही मंत्री झाले आहेत. हे तिघेही हेमंत सोरेन यांच्या मागील सरकारमध्ये मंत्री होते.

## लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसच्या ईव्हिएम हटावो हस्ताक्षर मोहिमेस जनतेचा भरपूर प्रतिसाद




**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद),** दि.५ (प्रतिनिधी) आज महाराष्ट्रात प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशाने ईव्हिएम हटावो बॅलेट पेपर लावो या मागणीसाठी हस्ताक्षर मोहिम सुरू करण्यात आली. या मोहिमेचा शुभारंभ आज दुपारी एक वाजता रेल्वेस्टेशन प्रवेशद्वारावर शहर जिल्हा कॉग्रेस कमेटीचे अध्यक्ष युसुफ शेख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला.

यावेळी विविध शहरातून व स्थानिक नागरिकांनी हस्ताक्षर मोहिमेस सही करुन प्रतिसाद दिला. यापुढे देशात व राज्यात होणाऱ्या सर्व निवडणुका बॅलेटपेपरवर घ्यावे. लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी हस्ताक्षर मोहिम शहरातील प्रत्येक वार्डात ५ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर पर्यंत घेतले जाणार आहे.

रेल्वेस्टेशन वर सही करण्यासाठी गर्दी उसळली होती. अशी माहिती शहराध्यक्ष युसुफ शेख यांनी यावेळी दिली.

यावेळी आकेफ रझवी, इंजिनिअर शेख इफ्तेखार, उमाकांत खोतकर, सुनिल साळवे, योगेश घोतात, अशोक बनकर, साहेबराव बनकर, श्रीकृष्ण काकडे, जफर खान, मुदस्सर अन्सारी, शफीक शहा, कैसर बाबा, अनिता भंडारी, शिलाताई मगरे, शकुंतला साबळे, विद्याताई घोरपडे, चंद्रप्रभा खंदारे, ईंदूताई खरात आदी उपस्थित होते.

## जेईएस महाविद्यालयामध्ये एड्स जनजागृती दिनानिमित्त रॅली व विविध स्पर्धा.




**जालना (प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जेईएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा व पोस्टर्स स्पर्धा घेण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उस्फृतपणे सहभाग नोंदवला.

'जान है ,तो जहान है!', 'जीवन अमूल्य आहे'. 'यह जिंदगी दोबारा नही मिलती'. 'निरोगी जीवन हीच खरी संपत्ती'. चला चला युवकांनो... एड्सच्या राक्षसला घालूया..... या घोषणा देऊन युवकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.महावीर सदावर्ते, उपप्राचार्य प्रा प्रवीण बाफना राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर तापडिया प्रा. योगेश लहमाटे आदींची उपस्थिती होती एड्स जनजागृती रॅलीमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ डिसेंबर २०२४


## राज ठाकरेंच्या फडणवीसांना शुभेच्छा अन् इशारा



**मुंबई** : महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन झाले आणि देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ देखील घेतली. याच सोबत एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी महायुतीचे विशेषतः देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. तसेच सरकारला इशारा देखील दिला आहे.

राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत म्हंटले की, आज माझे स्नेही आणि भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, याबद्दल त्यांचे अभिनंदन. २०१९ ला खरेतर ही संधी त्यांना मिळायला हवी होती, पण तेंव्हा आणि पुढे २०२२ मध्ये जे घडले त्यामुळे ती संधी हुकली. असो, पण यावेळेस महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला म्हणण्यापेक्षा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला जे प्रचंड अविश्वसनीय बहुमत दिले आहे, त्याचा या राज्यासाठी, इथल्या मराठी माणसांसाठी आणि मराठी भाषा आणि संस्कृतीसाठी तुम्ही योग्य वापर कराल अशी मी आशा करतो. पुढे राज ठाकरे यांनी लिहिले की, पुढची ५ वर्ष सरकारच्या कुठल्याही चांगल्या उपक्रमांना माझा, माझ्या पक्षाचा पाठींबा असेल.

महायुती सरकारला इशारा देत राज ठाकरे यांनी लिहिले की, पण सरकार चुकतेय, लोकांना गृहीत धरतेय असे जर जाणवले, तर मात्र विधिमंडळात जरी सध्या शक्य नसले तरी, विधिमंडळाच्या बाहेर मात्र आम्ही सरकारला त्यांच्या चुकांची जाणीव करून देऊ हे नक्की. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि श्री. अजित पवार आणि तसंच भविष्यातील त्यांच्या मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शुभेच्छा!, असे त्यांनी लिहिले आहे.

## विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून

**मुंबई** : देवेंद्र फडणवीस सरकारचा शपथविधी सोहळा पार पडल्यानंतर नागपुरात १६ डिसेंबरपासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. विधानसभा निवडणुकीतील हाराकिरीनंतरही महाविकास आघाडीने महायुती सरकारला पुरून उरण्याचा इशारा दिला आहे. पण आता विरोधी पक्षांच्या आमदारांना हिवाळी अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासात बोलण्याची संधीच मिळणार नसल्याची बाब समोर आली आहे.

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणार आहे. प्रशासनाकडून त्याची जय्यत तयारी सुरू आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात सर्वपक्षीय आमदार विविध आयुधांच्या माध्यमातून सरकारला धारेवर धरतात. आपल्या मतदारसंघातील समस्या व प्रश्न मांडून सरकारचे त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. तारांकित प्रश्न हे यासाठी अत्यंत महत्त्वाचे आयुध मानले जाते. पण फडणवीस सरकारच्या पहिल्या हिवाळी अधिवेशनात कोणत्याही आमदारांना तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून सरकारकडे आपले मुद्दे मांडता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, आमदारांना तारांकित प्रश्नांच्या यादीत आपल्या प्रश्नांचा समावेश करण्यासाठी ४० ते ४५ दिवसांपूर्वी ऑनलाईन पद्धतीने आपले प्रश्न पाठवावे लागतात. त्यानंतर विधिमंडळ सचिवालयाकडून ते संबंधित विभागाकडे पाठवले जातात. त्याचे त्यांच्याकडून उत्तर मागवले जाते. मंत्र्यांच्या नावे लेखी प्रश्न व उत्तरे अशी तारांकित प्रश्नांची पुस्तिका छापली जाते. अधिवेशनाचा पहिला तास प्रश्नोत्तरासाठी राखीव असतो. त्यात ही पुस्तिका तारखेनिहाय ठेवली जाते.

सभागृहात प्रश्न पुकारल्यानंतर संबंधित मंत्री त्याची तोंडी उत्तरे देतो. यावेळी काही उपप्रश्नही उपस्थित केले जातात. मंत्र्यांच्या उत्तराने समाधान झाले नाही तर सभागृहात गदारोळाचीही स्थिती उद्भवते. विरोधकांकडून संबंधित मंत्र्याला धारेवर धरण्याचे काम केले जाते. पण आता येत्या हिवाळी अधिवेशनात असे काहीच होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

महायुती सरकारच्या शपथविधीनंतर अधिवेशनासाठी ४० दिवसांहून कमी दिवसांचा अवधी शिल्लक आहे. १६ डिसेंबरपासून प्रत्यक्ष अधिवेशनाला सुरुवात होणार असल्यामुळे आमदारांकडे आपले प्रश्न पाठवण्यासाठी एकच आठवड्याचा अवधी शिल्लक आहे. एवढ्या कमी वेळेत प्रश्न पाठवणे, त्याचे उत्तर संबंधित खाते व अधिकाऱ्यांकडून मागवणे, ते छापणे हे शक्य होणार नाही. त्यामुळे महायुती सरकारच्या पहिल्या अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तासच रद्द करण्यात येणार असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे. यामुळे विरोधकांच्या भात्यातील एक महत्त्वाचे आयुध कमी होणार आहे.

## संसद अधिवेशनाचा ८वा दिवस- विरोधक काळे जॅकेट घालून आले

**नवी दिल्ली** : संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा गुरुवारी आठवा दिवस आहे. विरोधी पक्षाचे खासदार काळे जॅकेट घालून संसदेत पोहोचले आणि घोषणाबाजी केली, मोदी-अदानी चोर है, अशा घोषणा दिल्या. संसदेच्या मागच्या ७ कामकाजात संभल हिंसाचार, मणिपूर हिंसाचार, शेतकऱ्यांच्या मागण्यांचा मुद्दा आणि अदानी प्रकरणाची सर्वाधिक चर्चा झाली.

राहुल आणि प्रियांका गांधीही विरोधी खासदारांमध्ये सामील झाले. घोषणाबाजी करताना विरोधी पक्षाच्या खासदारांनीही 'स्कूल देखो- अडाणी', 'सड़कें देखो- अडाणी', 'ऊपर देखो- अडाणी, नीचे देखो- अडाणी', अशा घोषणा दिल्या.

आंदोलनादरम्यान राहुल गांधी म्हणाले- तुम्ही (सरकार) कधी चौकशी करणार का? तुम्ही तुमची स्वतःची चौकशी करू शकता का? मोदीजी अदानींची चौकशी करू शकत नाहीत. कारण मोदींनी अदानीची चौकशी केली तर ते स्वतःची चौकशी करून घेतील. मोदी आणि अदानी हे दोन नसून एक आहेत.

## फडणवीसांनी लाडक्या बहिणींसाठी नाही, तर सगळ्या घटकांसाठी काम करावे : इम्तियाज जलील



**छत्रपती संभाजीनगर** : देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी फडणवीसांना शुभेच्छा दिल्या आहेत. मी देवेंद्र फडणवीसांचे अभिनंदन करतो, आता त्यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी काम करावे, असे इम्तियाज जलील म्हणाले. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे १३२ आमदार निवडून आले आहेत, ते कसे आलेत हे सगळ्यांना माहित आहे, असे म्हणत टोलाही लगावला.

महाराष्ट्राचे २१ मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांचा शपथविधी होणार आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार देखील उपमुख्यमंत्रिपदाची शपथ ग्रहण करणार आहेत. यासाठी अनेक नेत्यांकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आहेत. इम्तियाज जलील यांनी देवेंद्र फडणवीसांना शपथविधीसाठी शुभेच्छा दिल्या.

देवेंद्र फडणवीसांनी आता फक्त लाडक्या बहिणींसाठी नाही, तर लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके बेरोजगार या सगळ्यांसाठी काम करावे, असा चिमटा इम्तियाज जलील यांनी काढला. महाराष्ट्रात महायुती बहुमताने जिंकली. एकट्या भाजपने फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली १३२ आमदार निवडून आणले, ते कसे आले हे वेगळे सांगण्याची गरज नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्राच्या हितासाठी काम करावे. बेरोजगार तरुणांच्या हाताला काम द्यावे तसेच शेतकऱ्यांच्या मलाला भाव द्यावा, एवढीच अपेक्षा त्यांच्याकडून असल्याचे इम्तियाज जलील म्हणाले.

इम्तियाज जलील यांचा विधानसभा निवडणुकीत औरंगाबाद पूर्व मतदारसंघातून पराभव झाला. भाजपचे अतुल सावे यांनी २१०० मतांनी जलील यांना पराभूत केले. मतदानाच्यावेळी भाजपचे उमेदवार मंत्री अतुल सावे यांनी पैसे वाटप केले, असा आरोप इम्तियाज जलील यांनी केला होता. यासंदर्भातील व्हिडिओ आणि इतर पुरावे देखील इम्तियाज जलील यांनी निवडणूक आयोगाकडे पाठवले होते. जिल्हाधिकारी, निवडणुक निर्णय अधिकारी, पोलिस आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार देऊन चौकशीची मागणी केली होती. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यांची समिती नेमली होती.

या समितीने अतुल सावे यांना क्लिनचीट दिली. अतुल सावे यांनी पैसे वाटल्याचे सिद्ध झाले नसल्याचे समितीने अहवालात म्हटले. या जलील यांनी संताप व्यक्त केला आहे. हे प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत घेऊन जाणार असल्याचे इम्तियाज जलील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ डिसेंबर २०२४




मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा
महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)